# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १८६/२००८/ दिनांक :

## <u>न्यायनिर्णय</u>

१) गणेश यशवंत कानिटकर, अर्जदार
विजयनगर, कुपवाड, सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर, विरुध्द पक्षकार
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडल कार्यालय,
विश्रामबाग , सांगली.

२) कार्यकारी अभियंता (शहर),महावितरण,
शहर विभाग, हिराबाग वॉटर वर्क्सजवळ, सांगली.

३) उपकार्यकारी अभियंता,महावितरण,उ. वि. माधवनगर,सांगली.

**कोरम :-**
१) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

अर्जदार प्रतिनिधी - श्री. जावेद मोमीन, इचलकरंजी

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

<u>का.य. जगताप, अध्यक्ष यांचेतर्फे न्याय निर्णय</u> दिनांक : १२.११.२००८

प्रस्तुत तक्रार ही या मंचाकडे अंतर्गत तक्रार निवारण कक्षकडील प्रकरणाचा अंतीम निकाल लागण्या अगोदर नमुना ' अ ' मध्ये करण्याताआलेली आहे. तक्रारदार हा वि.प.चा ग्राहक असून तो पॉवरलूम चालवत आहे. वि.प.चे संबंधित उप विभागीय कार्यालय माधवनगर सांगली येथे आहे. तक्रारदार यांना वि.प.च्या माधवनगर उप विभागीय कार्यालयाकडून तक्रारदार यांच्याकडे दि. २०.५.२००८ अखेर असलेली थकबाकी रु. १९६२/– भरणे बाबत नोटीस देण्यात आली. अशी बाकी न भरल्यास विद्युत पुरवठा बंद करणे बाबत कारवाई करण्यात येईल असे कळविण्यात आले. सबब अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडील दिलेल्या तक्रार अर्जावरील निर्णयाची वाट न पहाता तक्रारदाराने प्रस्तुत तक्रार दाखल केली. त्यामध्ये वि.प.विरुध्द, अर्जदाराचा विद्युत पुरवठा बंद करु नये असा अंतरीम आदेशही मागविला.

तक्रारदाराचे म्हणणे असे की, महाराष्ट्र शासनाने यंत्रमागधारकांसाठी यंत्रमाग संजीवनी योजना लागू केली होती. त्या योजनेप्रमाणे दि. ३१.३.२००४ अखेर ग्राहकाकडे असलेल्या थकबाकीमध्ये ५०% सूट देण्याची योजना आहे. असे असतांनाही ग्राहकास त्या योजनेचा लाभ दिला गेला नाही व केवळ पोकळ थकबाकी ग्राहकाचे नांवे टाकलेली आहे. सबब ग्राहकाचे म्हणणे की, त्यास यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ देण्यात यावा व त्याप्रमाणे त्याचे विद्युत बिलाचा हिशोब करणे बाबत या मंचाकडून वि.प.स आदेश द्यावेत.

सदरचा अर्ज दि. ३.७.२००८ रोजी प्राप्त झालेवर त्यावेळचे मंचाचे सदस्यद्वय यांनी थकबाकीमुळे वीज पुरवठा बंद करु नये असा आदेश दि.१५.७.२००८ रोजी दिला. मात्र चालू बिले भरणेस तक्रारदारास कळविले. तद्नंतर वि.प.स नोटीस दिल्यावरुन वि.प.ने आपले म्हणणे दाखल केले व त्यामध्ये यंत्रमाग संजीवनी योजने बाबत ग्राहकाची जी जबाबदारी होती व ज्या कांही तक्रारदारांकडून थकबाकी ५०% इतकी भरण्यात आलेली होती त्यांनी चालू वीज बिले भरणे आवश्यक होते, त्या बाबत सविस्तर खुलासा केला. पुढे या मंचाने अर्जदार यांचेकडून सन २००४ पासून त्यांनी किती रकमा भरल्या या बाबत तपशिल मागविला व त्याप्रमाणे अर्जदार यांनी दि. ३.४.२००४ ते १६.३.२००५ या काळामध्ये एकूण रक्कम रु. ४०९३१/– भरल्याचा खुलासा केला. अशी रक्कम भरल्याचे वि.प.ला मान्य आहे. पुढे वि.प.तर्फे सीपीएलचे उतारे तसेच प्रस्तुत प्रकरणामध्ये सविस्तर खुलासा व यंत्रमाग संजीवनी योजनेप्रमाणे महाराष्ट्र शासनाने पॉवरलूम विद्युत ग्राहकास जी सवलत दिलली होती त्या सवलतीच्या दराने जी बिले व येणे रकमा आहेत, त्या बाबतची सन एप्रिल २००० ते मे २००५ पर्यंतची ऑडीटेड स्टेटमेंटस् दाखल केली. त्याप्रमाणे सदरील प्रकरणामध्ये वि.प.ने दिलेली ऑडीटेड स्टेटमेंटस् व सोबत दिलेल्या खुलाशाप्रमाणे सदर ग्राहकाची माहे मार्च २००४ रोजी रु.२६६०.६३ एवढी थकबाकी होती. यंत्रमाग संजीवनी योजनेप्रमाणे यामध्ये ५०% म्हणजे रु. १३३०.३२ एवढी रक्कम माफ करण्यात आली. पुढे एप्रिल २००४ ते फेब्रुवारी २००५ या काळामध्ये वापरलेली वीज व त्याचा आकार रु. ३२७७२.३० असा धरुन फेब्रुवारी २००५ रोजीची एकूण येणे रक्कम रु. ३४१०२.६२ अशी होय. ग्राहकाने वि.प.यांना लेखी पत्र देवून कळविले आहे की, यंत्रमाग संजीवनी योजनेप्रमाणे त्यास फायदा देवून उरलेली रक्कम व पुढील नियमित बील ते भरण्यास तयार आहेत. त्याप्रमाणे दिनांक ४.४.२००४ ते मार्च २००५ या काळामध्ये ग्राहकाने एकूण रक्कम रु. ४०९३१/– भरलेली आहे. परिणामी, या प्रकरणामध्ये अर्जदारास रु. १३३०.३२ एवढ्या रकमेचा यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. परंतु मार्च २००५ नंतर पुढे जुलैं २००८ अखेर दिलेल्या बिलापोटी ग्राहकाकडे रु. ८२६६.९३ एवढी थकबाकी आहे व अशी रक्कम देणे त्यास क्रमप्राप्त आहे. सबब सदरचे प्रकरण फेटाळण्यास वि.प.ने विनंती केलेली आहे.

या प्रकरणामध्ये अर्जदारातर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री. जावेद मोमीन तसेच वि.प.तर्फे संबंधित अधिकारी तसेच त्यांचे सहाय्यक लेखापाल यांचे म्हणणे मंचाच्या सदस्यांनी ऐकले आहे.

दोन्ही पक्षकारांचे म्हणणे, यंत्रमाग संजीवनी योजने बाबतची परिपत्रके तसेच सीपीएलचे उतारे व ऑडीटेड स्टेटमेंटस् याचा विचार करता खालील प्रमाणे मुद्दे आमचे विचारार्थ उद्‌भवतात.

१) प्रस्तुत प्रकरणामध्ये यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ अर्जदारास देण्यात आला आहे का ?

उत्तर : होय

२) अर्जदाराला थकबाकी बाबत दिलेल्या नोटीसीप्रमाणे अर्जदाराने रक्कम भरणे आवश्यक आहे काय ? तसेच नोटीसी नंतरचे बिलाची रक्कम भरणे आवश्यक आहे काय ?

उत्तर : होय

३) आदेश ?

उत्तर : अखेरच्या आदेशाप्रमाणे

**<u>कारणमिमांसा :</u>**

सकृतदर्शनी ' अ ' नमुन्यातील अर्जामध्ये हा अर्जदारास यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळाला नाही अशा प्रकारची तक्रार केल्याचे दिसून येते. अर्जदाराने केव्हा व किती रकमा भरल्या या बाबत अर्जामध्ये कोठेही उल्लेख नाही. परिणामी, या मंचाच्या आदेशाप्रमाणे अर्जदाराने वेळोवेळी किती रकमा भरल्या या बाबतचा तपशिल दि. २०.८.२००८ रोजी या प्रकरणामध्ये दाखल केला आहे. ती एकूण रक्कम रु. ४०९३१/– ही दि. २३.४.२००४ ते दि. १६.३.२००५ या काळामध्ये अर्जदाराने भरलेली आहे. अशी भरणा रक्कम वि.प.ला मान्य आहे. अशी रक्कम भरले बाबत सीपीएलमध्येही नोंद आहे. मात्र सीपीएलमध्ये आकारणी केलेले वीज बील हे महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या नियमाप्रमाणे असलेने व त्यामध्ये यंत्रमागधारकांना महाराष्ट्र शासनाने सूट दिली असल्याचा उल्लेख नसलेने तशा बाबत वि.प. यांनी सूट दिलेल्या आकारणी प्रमाणे वेळोवेळी होणारे वीज बील या बाबत तसेच ग्राहकाने वेळोवेळी भरलेली रक्कम यावर ऑडीटेड अकौंट स्टेटमेंटस् दाखल केलेले आहे. अशी तरतूद ही वाणिज्य परिपत्रकातील बी–८० प्रमाणे बील ॲडजस्टमेंटसाठी (दुरुस्तीसाठी) करण्यात आलेली आहे. अशा ऑडीटेड स्टेटमेंटमध्ये ग्राहकाने वेळोवेळी भरणा केलेली रक्कम त्या त्या तारखेला जमा दाखविण्यात आलेली आहे. त्या स्टेटमेंटमध्ये सदरील ग्राहकास यंत्रमाग संजीवनी योजनेचा मार्च २००४ थकबाकीवर ५०% रक्कम कमी करुन लाभ दिलेला आहे व पुढे नियमित होणारी रक्कम व त्यामध्ये ग्राहकाने भरलेली रक्कम याचा उल्लेख केलेला आहे. परिणामी, नोटीसीप्रमाणे दि. २०.५.२००८ अखेर असलेली रक्कम ही ग्राहकास भरणे क्रमप्राप्त आहे. सीपीएलमध्ये ज्या क्रेडीट रकमेचा उल्लेख आहे तो उल्लेख शासनाच्या सवलतीप्रमाणे वीज बिलाची आकारणी केली नसलेने व संगणकाच्या दोषामुळे झालेली आहे. यामध्ये ग्राहकाने भरलेली रक्कम रु. ४०९३१/– ही ग्राहकास मान्य आहे तसेच वि.प.सही मान्य आहे. या व्यतिरिक्त कोणत्या आगाऊ क्रेडीट रकमेचा उल्लेख जरी सीपीएलमध्ये दिसत असला तरी तो योग्य व ग्राह्य नाही. म्हणूनच बी–८० प्रमाणे अशी रक्कम बील ' ॲडजस्टमेंट ' म्हणून नोंद केलेली आहे.

आमच्या समोर आलेल्या कागदपत्रांच्या पुराव्यावरुन व ग्राहकाने दर्शविलेल्या भरणा रकमेवरुन तसेच ऑडीटेड स्टेटमेंटस् प्रमाणे या ग्राहकास मार्च २००४ ते मार्च २००५ या काळामध्ये यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. सबब या प्रकरणामध्ये त्यांना कोणतीही दाद देता येवू शकत नाही. तसेच वि.प.ने दिलेली नोटीस देखील योग्य व बरोबर असल्याचे दिसून येते. ऑडीटेड स्टेटमेंटस् प्रमाणे जी रक्कम दाखविली आहे ती योग्य असून मे २००५ नंतरची रक्कम त्यांना दिलेल्या बिलाप्रमाणे योग्य व बरोबर आहे.

सबब आम्ही वरील मुद्दा क्र. १ व २ कडे आमचे निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

वरील कारणमिमांसा विचारात घेवून प्रस्तुत अपिल फेटाळणे क्रमप्राप्त ठरते, पण खर्चा बाबत कोणतेही आदेश करणेची आवश्यकता नाही. सबब खालील प्रमाणे आदेश :

## आदेश

१) अपिल फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चा बाबत आदेश नाही.

३) सदरचे तक्रार अर्जदारा बाबत दिलेले दि. १५.७.२००८ व दि. ११.८.२००८ चे तात्पुरते स्थगन आदेश उठविण्यात येत आहेत.

४) विद्युत वितरण कंपनीला तक्रारदार ग्राहकाकडील येणे बाकी नियमाप्रमाणे वसुलीची मुभा आहे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : १२.११.२००८

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..